# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### कोठोरे ग्रामपंचायतीमधील (ता.शहापूर, जि. ठाणे) थड्याचा पाडा या गांवात श्री फेज विदयुत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१) ४५१६६ (२२-०९-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोठोरे ग्रामपंचायतीमधील थड्याचा पाडा (ता.शहापूर, जि. ठाणे) हे गांव अतिदुर्गम भागात असल्यामुळे शासनाने या गावांसाठी पाणीपुरवठा विभागामार्फत स्वतंत्र पाणीपुरवठा योजना मागील वर्षी कार्यान्वित केली असल्याचे दिनांक ७ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणीपुरवठा योजनेसाठी तेथील भातसा धरणाच्या खोऱ्यातून या गावासाठी दोन ते अडीच किलोमीटर खोल दरीतून उंच अंतरावर पाणी पम्पिंग करावे लागत असल्याने व पंप हाऊसपर्यंत श्री फेजचा विद्युत पुरवठा होत नसल्याने सदर पाणीपुरवठा योजना विद्युत पुरवठ्याअभावी वर्षभरापासून बंद असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधी व महावितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता यांनी संयुक्तपणे योजनाधीन थड्याचा पाडा ते भातसा बँक वॉटरपर्यंत भेट देऊन माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान पंप हाऊस पाहणी केली असून सदर पाणी योजनेसाठी स्वतंत्र ट्रान्सफार्मर १५ दिवसात बसवून देण्याचे संबंधित उपमुख्य कार्यकारी अभियंता यांनी सांगण्यांत येवून अद्यापही स्वतंत्र ट्रान्सफार्मर बसविण्यात आला नसल्याचे माहे एप्रिल, २०२२ अखेरपर्यंत निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पाणीपुरवठा योजनेस श्री फेज विदयुत पुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१०-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) कोठारे ग्रामपंचायतीमधील थडयाचा पाडा (ता.शहापूर, जि.ठाणे) या गावासाठी जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत रेट्रोफिटींग नळ पाणी पुरवठा योजना सन २०२१-२२ मध्ये मंजूर करण्यात आली आहे. सदर योजनेचे काम पूर्ण करण्यात आले असून योजना ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्यात आली आहे.

सदर योजना सिंगल फेज असल्याने योजनेकरीता सोलारची तरतूद करण्यात आली असून योजनेतून सुरुळीत पाणी पुरवठा चालू आहे. ग्रामपंचायत, कोठारे यांनी स्वतंत्र ट्रान्सफार्मर बसविण्याकरीता महाराष्ट्र विद्युत वितरण मंडळाकडे पत्रव्यवहार केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील कामगार उपायुक्त कार्यालयाला स्वत:च्या मालकीची जागा उपलब्ध करून देण्याबाबत**

**(२) ४९४७२ (१६-०१-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील कामगार उपायुक्त कार्यालयाला स्वत:च्या मालकीची जागा उपलब्ध नसल्यामुळे व भाडे तत्वाने जागा मिळत नसल्याने प्रशासकीय काम करण्यास कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे नोव्हेबर, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेले भाडे अत्यंत कमी असून सद्याच्या बाजार भावाप्रमाणे जागेचे भाडे दुप्पट ते तिप्पट असल्याकारणाने कामगार विभागाला कमी दरात भाडयाने जागा मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कामगार उपायुक्त कार्यालयाला स्वत:च्या मालकीची जागा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१३-०७-२०२३) :** (१) कामगार उप आयुक्त, रायगड हे कार्यालय सद्य:स्थितीमध्ये भाड्याच्या जागेत सुरु असून जागा मालकाने सदर जागा खाली करण्यासाठी मा.दिवाणी न्यायालय, पनवेल येथे दावा दाखल केला आहे. तथापि, कार्यालयाचे कामकाज नियमित व सुरळीतपणे सुरु आहे.

(२) व (३) कामगार उप आयुक्त, रायगड कार्यालयास कायमस्वरुपी जागा उपलब्ध व्हावी म्हणून कामगार उप आयुक्त, रायगड कार्यालयामार्फत जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांच्याकडे शासकीय जागेची मागणी करण्यात आली आहे. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी दि.२६.०५.२०२३ अन्वये सदर प्रस्ताव शासनास (महसूल व वन विभाग) सादर केलेला आहे. सदर जागा उपलब्ध झाल्यानंतर त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात बेरोजगारीचे प्रमाण वाढले असल्याबाबत**

**(३) ४९६३२ (२१-०१-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उच्चशिक्षित तरुण, तरुणींना रोजगार मिळत नसून बेरोजगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने राज्यात जास्तीत जास्त रोजगार निर्मिती करून शासकीय विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (१२-०७-२०२३) :** (१) भारताचा लोकशाहीवादी युवा महासंघ जिल्हा समिती यांचे दिनांक १५.०२.२०२२ रोजीचे अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झालेले आहे.

आयुक्तालयाच्या महास्वयंम या वेबपोर्टलवर राज्यातील उच्चशिक्षित नोंदणी झालेल्या, नोकरीस लागलेल्या व नोंदणीपटावर असणाऱ्या उमेदवारांची माहे जानेवारी २०२२ ते माहे डिसेंबर, २०२२ माहिती खालीलप्रमाणे आहे:-

* पदवीधर नोंदणी-८८,५३८
* नोकरीस लागलेले उमेदवार-५९४७७
* पदव्युत्तर नोंदणी-९१७८

* नोकरीस लागलेले पदव्युत्तर उमेदवार-२८२६
(२) शासकीय रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही शासनाच्या विविध विभागा मार्फत शासनस्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील अनेक गावांत विकास कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(४) ५१७४० (२०-०१-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील १३४ गावांत अंतर्गत वाद व इतर कारणामुळे दोन वर्षात १५ व्या वित्त आयोगाच्या विधीतील एक रुपयाही खर्च केला नसल्याचे दिनांक ०४/०९/२०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदरील निधी विकासकामांसाठी निर्धारित वेळेत खर्च करुन प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१५-०६-२०२३) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) होय.

सदर प्रकरणी जिल्हा परिषद स्तरावर संबधित ग्रामपंचायतीचे सरपंच / ग्रामसेवक यांची तीन वेळा सूनावणी घेऊन त्यांचे तांत्रिक/ प्रशासकिय/इतर अडचणी दुर करणेकरीता कार्यवाही करणेत येऊन निधी वेळेत खर्च होईल या करीता पाठपुरावा करणेत येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे भाटूंबा (ता. केज, जि. बीड) ग्रामपंचायतच्या विविध कामामधील भ्रष्टाचाराची चौकशी करणेबाबत**

**(५) ५२१७० (२१-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे भाटूंबा (ता. केज, जि. बीड) येथील कार्यरत असलेले मागील ग्रामपंचायतीच्या कार्यकाळातील पदाधिकारी यांनी त्यावेळी ग्रामपंचायत हद्दीतील विविध कामांत मोठया प्रमाणात अनियमितता व गैरव्यवहार केला असून सदर संबंधितावर कार्यवाही होत नसल्याने श्री.सुनील शिवकीरण धपाटे (सरपंच, भाटूंबा) यांनी दिनांक १०/११/२०२२ रोजी वा त्यासुमारास गावकऱ्यांसह तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करून कार्यवाही करण्याबाबत उपआयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद. यांनी मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प. बीड. यांना दिनांक ०५/११/२०२२ व दिनांक ११/११/२०२२ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपमुख्यकार्यकारी अधिकारी (ग्रा.पं), जिल्हा परिषद, बीड यांनी दिनांक १५/११/२०२२ रोजी उपोषण कर्त्यांची भेट घेऊन चर्चा करून भाटूंबा, ग्रामपंचायत कार्यालयातील संगणक गहाळ प्रकरणी तत्कालीन ग्रामसेवक यांना तक्रार देऊन गुन्हे दाखल करण्याबाबत आदेशित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे लेखी आदेश असूनही संबंधितानी तक्रार देऊन जाणीवपूर्वक गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करत असल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधितावर कारवाई करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री व मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प. बीड. यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६)असल्यास, शासनाने चौकशी केली आहे त्यानुसार संबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणी श्री. डी.ए.सोनवणे, तत्कालिन ग्रामसेवक, ग्रा.पं. भाटुंबा यांना दिनांक १५.११.२०२२ च्या पत्रान्वये पोलीस गुन्हा नोंद करणेबाबत आदेशित केले होते. सदर प्रकरणात त्यांनी गुन्हा दाखल न करता दिनांक १८.११.२०२२ च्या पत्रान्वये संगणक खाजगी एजन्सीकडे दुरुस्ती करीता देण्यात आलेला होता तसेच सदरील संगणक रितसर दिनांक १९.०५.२०२१ रोजी गट विकास अधिकारी, पं.स. केज येथे जमा केला आहे. तरी पं.स. केज येथे जमा केलेला संगणक सद्याचे कार्यरत ग्रामसेवक यांना हस्तगत करुन देण्यासाठी आदेशित व्हावे अशी विनंती मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. बीड यांना केली. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गट विकास अधिकारी यांना सदरील संगणक ग्रामपंचायत कार्यालय भाटुंबा येथे जमा करणेबाबत कळविले आहे.
(५) होय, हे खरे आहे.
(६) प्रस्तुत प्रकरणात श्री. ए.एस.सोळंके, श्री. आर.के. चौरे व श्री. डी.ए. सोनवणे यांना कारणे दाखवा नोटीस देऊन जोडपत्र १ ते ४ बजावून खुलासा मागविण्यात आला होता. संबंधितांनी दिलेला खुलासा असमाधानकारक असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे. तसेच तक्रारदारांनी उपोषण सोडवताना नव्याने चौकशी करणेबाबत मागणी केल्याने चौकशी समिती नियुक्त करण्यात आलेली आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्हा परिषदेंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती करणेबाबत**

**(६) ५२४३९ (१९-०१-२०२३). श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा):** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) लातूर जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील बहुतांश ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग खराब झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच औसा व निलंगा तालुक्यातील ग्रामीण रस्ते व इतर जिल्हा मार्ग रस्ते दर्जोन्नत करण्याबाबत औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे आक्टोंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्गांची दुरुस्ती व सदरील रस्ते दर्जोन्नत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२४-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) ३०५४ रस्ते व पूल दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमांतर्गत, जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत (३०५४ व ५०५४) व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी लातूर जिल्ह्यासाठी रु.१७१.२६ कोटी, सन २०२०-२१ मध्ये रु.१२४.०१ कोटी व सन २०२१-२२ मध्ये रु.१०२.११ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच यापुढेही निधीच्या उपलब्धतेनुसार ग्रामीण रस्त्यांची दुरुस्ती करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय दि.०२.१२.२०२१, दि.२४.०६.२०२२ व दि.१६.१२.२०२२ अन्वये लातूर जिल्हा परिषदेकडील काही ग्रामीण व इतर जिल्हा मार्ग दर्जाचे रस्त्यांचे अनुक्रमे २, १ व १८ असे एकूण २१ प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जोन्नत करण्यात आले आहेत. तसेच औसा व निलंगा तालुक्यातील काही ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांचे प्रमुख जिल्हा मार्ग म्हणून दर्जोन्नतीचा प्रस्ताव क्षेत्रिय कार्यालयाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्राप्त झाला असून त्यामध्ये काही त्रुटी आहेत. सदर त्रुटींची पूर्तता होताच पुढील कार्यवाही करण्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भाताण (ता.पनवेल, जि.रायगड) येथील अमेटी युनिव्हर्सिटीच्या प्रशासनाने स्थानिक कामगारांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण न केल्याबाबत**

**(७) ५२४७३ (१८-०१-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भाताण (ता.पनवेल, जि.रायगड) येथील अमेटी युनिव्हर्सिटीच्या प्रशासनाने स्थानिक कामगारांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण न केल्यामुळे कामगारांनी गेट बंद आंदोलन केले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कामगारांनी किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन मिळावे तसेच विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण मिळावे अशा मागण्या अमेटी युनिव्हर्सिटीकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून स्थानिक कामगारांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१३-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे. तथापि, किमान वेतन अधिनियम, १९४८ मधील अनुसूची (I) व (II) मध्ये शैक्षणिक संस्था" यांचा समावेश नसल्याने अमेटी विद्यापीठ, मुंबई या संस्थेस किमान वेतन अधिनियमाच्या तरतूदी लागू होत नाहीत.
(३) कर्मचाऱ्याच्या आंदोलनाच्या अनुषंगाने कामगार उपायुक्त, रायगड यांनी चौकशी केली असता कर्मचाऱ्यांच्या आंदोलनानंतर विद्यापीठ प्रशासनाने कर्मचाऱ्यांना माहे जानेवारी २०१९ ते जानेवारी २०२२ पर्यन्तची वार्षिक वेतनवाढ दिली असून फरकाची रक्कम माहे डिसेंबर २०२२ मध्ये अदा केली असल्याचे निदर्शनास आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यातील ४७ ग्रामसेवकांनी दफ्तर दिरंगाई केल्याबाबत**

**(८) ५२५६२ (२०-०१-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील ग्रामपंचायतीचा कारभार करणाऱ्या ग्रामसेवकांकडून दरवर्षी ग्रामपंचायतीचे दफ्तर तपासणीसाठी देणे बंधनकारक असतांनाही चार ते पाच वर्षे होवूनही ४७ ग्रामसेवकांनी दफ्तर दिरंगाई केल्याचे माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू ग्रामसेवकांनी ग्रामपंचायतीचे दफ्तर दरवर्षी तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्याचे कायदेशीर बंधनकारक असतानाही ग्रामसेवक यांनी दफ्तर तपासणीसाठी सादर केलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नअनुषंगाने उक्त ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांकडून दफ्तर तपासणीस दिरंगाई केल्याबाबत शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-०६-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

ग्रामपंचायतीचे दप्तर दरवर्षी तपासणीसाठी उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. तथापि, नाशिक जिल्ह्यातील ४७ ग्रामसेवकांनी दप्तर तपासणीसाठी सादर केले नसल्याची बाब माहे जुले, २०२२ मध्ये निदर्शनास आली आहे.

(३) सदर प्रकरणी जिल्हा परिषद प्रशासनाकडून चौकशी करण्यात आली असून ४७ ग्रामपंचायतीचे तत्कालिन ग्रामसेवक/ ग्रामविकास अधिकारी यांनी अभिलेखे, दप्तर लेखापरिक्षणास उपलब्ध करुन न दिल्यामुळे प्रत्येकी रु. २५,०००/- एवढ्या दंडाची कार्यवाही करण्यात आली आहे. सदर ४७ ग्रामसेवकांपैकी २० ग्रामसेवकांकडून दंडाची रक्कम वसूल केली असून उर्वरित ग्रामसेवकांकडून रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

या ४७ ग्रामपंचायतीपैकी सद्यस्थितीत १० ग्रामपंचायतीचे लेखापरिक्षण झाले असून ०३ ग्रामपंचायतीचे दप्तर लेखापरिक्षणासाठी उपलब्ध आहे. उर्वरित ग्रामपंचायतीचे दप्तर उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प निदेशकांना कंत्राटी सेवेत सामावून घेणेबाबत

**(९) ५२६०१ (१८-०१-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प निदेशकांना १४५७ पदांच्या भरतीपूर्व तासिका तत्वावर काम करणाऱ्या अनुभवी शिल्प निदेशकाना कंत्राटी पध्दतीने सामावून घेण्याबाबतची मागणी शिल्प निदेशक संघ यांनी माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तासिका शिल्प निदेशकांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून कोणतेही अनुभव प्रमाणपत्र दिले जात नसून ते अन्य कोणत्या ठिकाणी काम करू शकत नसल्याने त्यांचे भवितव्य अंधारात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प निदेशकांना कंत्राटी सेवेत सामावून घेणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (१२-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक दिनांक ०३.०७.२००४ अन्वये तासिका व इतर पदांचा अनुभव सेवाभरतीसाठी ग्राह्य धरला जात नसल्याने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील तासिका तत्वावरील निदेशकांना अनुभव प्रमाणपत्र दिले जात नाही. तसेच तासिका तत्वावरील निदेशकांकडून ते तासिका तत्वावर काम केल्याचा आधार घेवून नियमित नियुक्तीसाठी कुठलाही हक्क मागणार नाही, असे हमीपत्र घेण्यात येते.

(३) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये सद्यस्थितीत २९७ कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील कार्यरत कंत्राटी शिल्पनिदेशक यांच्या शासन सेवेत नियमित करणेबाबत मागणीच्या अनुषंगाने मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन योग्य तो निर्णय घेण्यात यावा, असा निर्णय दिनांक १६ मे, २०२३ च्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेला आहे. तसेच कंत्राटी निदेशकांच्या मानधनात

रु. १५०००/- वरुन रु. २५०००/- वाढ करण्याबाबत देखील निर्णय घेण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## विकासकामावरील स्थगिती उठविण्याबाबत

**(१०) ५२७६८ (२१-०१-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर व कळमेश्वर (जि.नागपूर) तालुक्यात ग्रामविकास विभागामार्फत २५१५ या योजनेसह इतर योजनेमधून विविध विकासाची कामे मंजूर करण्यात आलेली असतांना उक्त तालुक्यात मंजूर करण्यात आलेल्या परंतू प्रत्यक्षात सुरू न झालेल्या बांधकामास शासनाने माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान परिपत्रक काढून स्थगिती दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने ग्राम विकास विभागातील कोणकोणत्या कामांची स्थगिती उठविलेली आहे व त्यात नागपूर जिल्हयातील कोणकोणत्या कामाचा समावेश आहे

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्नअनुषंगाने उक्त सर्व कामावर शासनाने दिलेली स्थगिती उठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) लेखाशिर्ष २५१५ १२३८ (मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मूलभूत सुविधा पुरविणे) या योजनेअंतर्गत नागपुर जिल्ह्यातील रक्कम रु. १२.७५ कोटी इतक्या कामांची स्थगिती उठविण्यात आली आहे. याप्रकरणी विभागास जसे प्रस्ताव प्राप्त होत आहेत त्यानुसार शासन मान्यतेने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम,१९८१ व त्याअंतर्गत असलेली खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना,२००२ (सुधारीत) अतिरिक्त पदे भरण्याबाबत

**(११) ५२७७४ (२४-०१-२०२३). श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ च्या कलम ६ अन्वये दिनांक १६ जुलै,१९८१ मध्ये सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हयाकरिता या मंडळाची स्थापना केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम,१९८१ च्या कलम ८ अन्ववये तसेच खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना,२००२ (सुधारीत) या योजनेची अंमलबजावणी करणे हे मंडळाची जबाबदारी/कर्तव्य असून खंड ४ ची अंमलबजावणी करणे मंडळावर बंधनकारक/कर्तव्य आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सध्या मंडळाचे मंजूर पदाच्या २० ते २५ टक्केच कर्मचारी कार्यरत आहेत, उर्वरित काही कर्मचारी बाहययंत्रणेकडून कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेले असल्याने मंडळाचे कामकाज प्रंलबित आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना,२००२ (सुधारीत) योजनेच्या खंड ४ नुसार रिक्त पदे भरण्याबाबत मंडळाला अधिकार दिले असताना मंडळ रिक्त पदे भरत नसल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (०५-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) राज्यातील सर्व सुरक्षा रक्षक मंडळांचे सुधारित आकृतीबंध निश्चित करण्याची कार्यवाही सुरू असून तद्नंतर सुधारित पदभरती नियमावली व भरती प्रक्रिया राबविण्याचे प्रयोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे फुबगाव (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील उपसरपंच यांनी ग्रामपंचायत कार्यालय बंद ठेवल्याबाबत**

**(१२) ५२७८० (२०-०१-२०२३). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे फुबगाव ग्रामपंचायत (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील ग्रामपंचायतीचे उपसरपंच यांनी ग्रामपंचायत कार्यालय बदं ठेवल्याने सचिव गैरहजर असल्याबाबत दोघांविरुद्ध कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (धामणगाव रेल्वे) यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांना दिनांक २६.९.२०२२ व दिनांक ०९.११.२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर संबंधीत अधिकाऱ्यांवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (१९-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडून दोषी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्याबाबत सरपंच व सचिव, ग्रामपंचायत, फुबगाव यांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अटकळ (ता.जि.बुलडाणा) आणि काटोडा (ता.चिखली, जि.बुलढाणा) या गावात मोबाईल टॉवर बसविणेबाबत**

**(१३) ५२८६२ (१९-०१-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अटकळ (ता.जि.बुलढाणा) आणि काटोडा (ता.चिखली, जि.बुलढाणा) या गावात मोबाईल टॉवर नसल्याने गावात मोबाईलची रेंज नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच, आपत्कालीन काळात सदरहू गावातील लोकांशी संपर्क साधणे कठीण होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त गावात मोबाइल टॉवर उभारण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्याकडे दिनांक ०७ /११/२०२२ रोजी वा त्या सुमारास केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने उक्त गावात मोबाइल टॉवर उभारण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-०६-२०२३) :** (१) व (२) होय, खरे आहे,
(३) अंशत: खरे आहे
मौजे अटकळ येथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी बुलढाणा यांचेकडे दि.३१/१०/२०२२ रोजी निवेदन सादर केले आहे.

(४) भारत सरकारच्या Saturation Project अंतर्गत मौजे अटकळ येथे मोबाईल टॉवरसाठी शासकीय जमीन अधिग्रहण करण्यास जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी दि.१३/०२/२०२३ रोजी मान्यता दिली असून त्यानुसार बि.एस.एन.एल. मार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**पालघर जिल्हा परिषदेच्या पाणी व स्वच्छता विभागात विविध पदांवर असलेल्या कर्मचाऱ्यांना गेल्या वर्षभराचा प्रोत्साहन भत्ता मिळाला नसल्याबाबत**

**(१४) ५२९२८ (२०-०१-२०२३). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागात विविध पदांवर कंत्राटी तत्वावर काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांना गेल्या वर्षभराचा प्रोत्साहन भत्ता देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार उक्त कंत्राटी कर्मचाऱ्यांचा थकीत प्रोत्साहन भत्ता तातडीने देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१४-०६-२०२३) :** (१) नाही. डिसेंबर, २०२२ पर्यंतचा प्रोत्साहन भत्ता माहे डिसेंबर, २०२२ मध्ये अदा करण्यात आलेला आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील रस्ते व पुलांच्या दुरुस्तीबाबत**

**(१५) ५२९५३ (१८-०१-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हापरिषद बांधकाम विभागाकडील ग्रामीण व इतर जिल्हा मार्गाचे जून-जुलै, २०२२ या कालावधीत ४०-३५ कि.मी.चे रस्ते आणि ८ पुलांचे अतिवृष्टी आणि पूरामुळे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्ते व पूलाच्या कामांच्या तात्पुरत्या दुरुस्तीसाठी ३ कोटी १४ लाख २५ हजार रुपयांचा खर्च अपेक्षित आहे तर कायमस्वरुपी दुरुस्तीसाठी ९५.६६ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन व निधीची तरतूद करुन येथील क्षतीग्रस्त रस्ते व पुलांच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१५-०६-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्यांच्या व त्यावरील पुलांच्या दुरुस्तीसाठी शासनाने दि.२८ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये ३०५४-२९११ हे स्वतंत्र नवीन लेखाशिर्ष घेतले आहे. सदर लेखाशिर्षातंर्गत उपलब्ध होणा-या निधीमधून अतिवृष्टीमुळे बाधित रस्त्यांची कामे हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कचारगड (ता. सालकेसा, जि. गोंदिया) येथील कचारगड तिर्थक्षेत्राला 'अ' वर्ग दर्जा मान्यता मिळणेबाबत**

**(१६) ५३०८२ (२०-०१-२०२३). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कचारगड (ता. सालकेसा, जि. गोंदिया) येथील कोपारलिंगोमा काली कंकाली देवस्थानाला 'ब' दर्जा असून सन २०१८ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री यांनी 'अ' दर्जा तिर्थक्षेत्राचा दर्जा देण्याची घोषणा केल्यानुसार तसा प्रस्ताव जिल्हाधिकारी गोंदिया यांनी दिनांक २ ऑगस्ट २०१९ च्या पत्रान्वये ग्रामविकास विभागाकडे सादर केला आहे, प्रस्ताव अद्याप निर्णयाविना प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कचारगड देवस्थान 'अ' दर्जा वर्गाचे निकष पूर्ण करित असूनही दर्जात वाढ न झाल्याने अद्यापपर्यंत विकास कामांसाठी पुरेसा निधी शासनाकडून प्राप्त होत नसल्याने तिर्थस्थळाचा पुरेसा विकास होवू शकत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तदनुषंगाने कचारगड देवस्थान दर्जा वाढीचा प्रस्ताव प्रलंबित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांची शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१५-०६-२०२३) :** (१) होय, अंशतः खरे आहे.

सदर तीर्थक्षेत्रास दि. ११ ऑगस्ट, २०१६ रोजी राज्य निकष समिती व्दारा ब-वर्ग दर्जा प्रदान केला आहे. सदर प्रस्ताव ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांच्या विकासाकरिता रु. २ ते २५ कोटीपर्यंत अनुदान या योजनेंतर्गत प्रस्तावित आहे.

(२) देवस्थानच्या प्रस्तावानुसार या विभागाने दि.०६मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण भागातील यात्रास्थळांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम "ब" वर्ग दर्जा अंतर्गत रू.२.०० कोटी इतक्या रक्कमेच्या मर्यादेप्रमाणे या तीर्थक्षेत्रास स्वच्छतागृह (महिला व पुरुष), पेनठाणा येथे भक्तनिवास बांधणे, भक्तनिवास (महिला), भक्तनिवास (पुरुष) इ. कामास प्रशासकीय मान्यता दिली आहे. जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्याकडून कचारगड देवस्थानासाठी रु.२२.३० कोटी इतक्या रक्कमेचा विकास आराखड्याचा प्रस्ताव विभागास प्राप्त झाला असून, याप्रस्तावावर मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.१६/०२/२०२३ रोजी उच्चाधिकार समितीची बैठक झाली असून, समितीने सुधारित प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, गोंदिया यांना दिले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुखेड (जि.नांदेड) येथील लखमापुर ग्रामपंचायतमध्ये नाली सफाईचे काम न करता निधीचा अपहार केल्याबाबत**

**(१७) ५३०९० (२१-०१-२०२३). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) येथील लखमापूर ग्राम पंचायतीमधील सरपंच व ग्रामसेवक यांच्या संगनमताने काम न करता १५ व्या वित्त आयोगाअंतर्गत नालीसफाईच्या कामात ८० हजार रुपयांच्या निधीचा गैरव्यवहार केल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१२-०६-२०२३) :** (१) होय,
(२) गट विकास अधिकारी पंचायत समिती मुखेड यांच्या मार्फत चौकशी करण्यात आली असून सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार गैरव्यवहार झाला नसल्याचे आढळून आले आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**बंदीभागात पेंधा (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) गावाला रस्ता मंजूर करण्याबाबत**

**(१८) ५३२१९ (१८-०१-२०२३). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बंदीभागात पेंधा (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) गावाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाली तरी रस्ता नसल्याने तेथील गावक-यांनी जिल्हयाचे मा.पालकमंत्री यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनानुसार या गावाला रस्ता मंजूर करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१२-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) पेंदा ते इजिमा-२१७ ला जोडणारा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.१३१ असून सदर रस्त्याची एकूण लांबी ३ कि.मी. इतकी आहे. सदर संपूर्ण रस्ता हा कच्चा स्वरुपाचा असून प्रादेशिक वन विभागाच्या अखत्यारीतील आहे. यास्तव सदरचे काम करण्याकरीता वन विभागाची परवानगी घेऊन, त्यानंतर जिल्हा परिषदेस रस्ते व पूल दुरुस्ती अंतर्गत विविध योजनेमधून प्राप्त होणाऱ्या निधीमधून सदर काम घेण्याचे नियोजन करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. निधीच्या उपलब्धतेनुसार सदरचे काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केज (जि. बीड) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) मध्ये नवीन ट्रेड सुरु करणेबाबत.**

**(१९) ५३४०४ (२१-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज, जि. बीड येथे तत्कालीन मंत्री स्व.सौ. विमलताई मुंदडा यांच्या प्रयत्नातून ग्रामीण भागातील होतकरू व गोरगरीब शेतकऱ्यांच्या मुलांना विनामूल्य कौशल्य विकासाचे शिक्षण मिळावे या उद्देशाने शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) साठी इमारत बांधण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी गवंडीकाम व सुतारकाम हे दोनच ट्रेड रेग्युलर सुरू असून सिव्हिल व इलेक्ट्रॉनिक्स या ट्रेड साठीच्या जागा एक वर्ष आड भरल्या जात असून सदरहू टेड च्या प्रत्येकी फक्त एक एकच तुकड्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेता सदर ट्रेड रेग्युलर सुरू करून तुकड्यामध्ये वाढकरण्याची आवश्यकता तसेच इलेक्टीकल्स, इलेक्टानिक्स, मोटर मॅकॅनिक, डिजेल मॅकॅनिक व वायरमॅन हे ट्रेड सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्याकडे दिनांक. १७/०९/२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्नुसार उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदर ठिकाणी नवीन ट्रेड सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०९-०६-२०२३) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) सद्यस्थितीत संचालनालयाच्या स्तरावर कमी मागणीच्या व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकडयांचे रुपांतर आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत/अधिक मागणीच्या व्यवसायात करण्याची कार्यवाही सुरु आहे. तदनंतर औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा विस्तार आराखडा करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यामध्ये रोजगार साह्यासाठी १९ ठिकाणी मॉडेल करिअर केंद्रे उभारण्यात येणार असल्याबाबत**

**(२०) ५३४६१ (२१-०१-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये रोजगार साह्यासाठी १९ ठिकाणी मॉडेल करिअर केंद्रे उभारण्यात येणार असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने रोजगार साहयाची मॉडेल करिअर केंद्रे केव्हा पर्यंत उभारण्यात येणार आहेत तसेच सदरहू प्रकरणी किती रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०२-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे. केंद्र शासनाने त्यांच्या अनुक्रमे दिनांक २९.०४.२०२२, दिनांक ०५.०७.२०२२ तसेच दिनांक २०.०९.२०२२ पत्रान्वये सिंधुदुर्ग, सांगली, सोलापूर, नाशिक, जळगांव, लातूर, जालना व अकोला (आठ), तसेच पालघर, औरंगाबाद, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, सातारा व हिंगोली (आठ) आणि धुळे, अमरावती आणि बुलडाणा (तीन) अशा १९ ठिकाणी मॉडेल करिअर केंद्रांना मान्यता दिलेली आहे.
(२) अंशत: खरे आहे, सदर योजना ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना आहे. त्यानुसार योजनेस केंद्र सरकार मार्फत निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे.
(३) सदर केंद्रे सन २०२३-२४ या वर्षात पुर्ण होणे अपेक्षित आहे. त्याकरीता मॉडेल करिअर केंद्रे उभारण्याकरीता केंद्र शासनाकडुन रु.८१९.८३ लाख इतका निधी टप्प्याटप्प्याने उपलब्ध होणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाड (जि.रायगड ) येथे क्रिडा संकुल उभारण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत**

**(२१) ५३४८५ (१८-०१-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड (जि.रायगड) येथे क्रिडा संकुल उभारण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विचाराधीन प्रस्तावावर केव्हापर्यंत कार्यवाही होणे अपेक्षित आहे,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर क्रिडा संकुल उभारण्याकरिता शासनाने किती निधीची तरतदू केली, वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. संजय बनसोडे (२०-०६-२०२३) :** (१) व (२) होय.

मौजे लाडीवली, (ता.महाड, जि.रायगड) येथील स.नं.३४ मधील १ हे ०५ आर जागेवर तालुका क्रीडा संकुल, महाड या संकुलाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरु आहे. मे, २०२३ पर्यंत इनडोअर हॉलचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) संकुलाचे बांधकाम सुरु असल्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

सदर संकुलाच्या उभारणीकरीता शासनाकडून रु.१०० लक्ष इतका निधी तालुका क्रीडा संकुल समितीकडे वर्ग करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कणकवली जिल्हा परिषद सेसच्या माध्यमातून यावर्षी शेतकऱ्यांना कृषी अवजारे देण्याच्यासाठी लाभार्थ्यांच्या यादीला मंजूरी मिळालेली नसल्याबाबत

**(२२) ५३७७८ (२१-०१-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली जिल्हा परिषद सेसच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अनुदानावर दरवर्षी कृषी साहित्य व अवजारे दिली जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षी शेतकऱ्यांना ही अवजारे देण्याच्यासाठी लाभार्थ्यांच्या यादीला मंजूरी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषदेने माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान प्रतिनिधीक कार्यक्रम घेऊन प्रत्येक तालुक्यातून दोन-दोन लाभार्थ्यांना अवजारांच्या वाटपाबाबतचा धनादेश दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन लाभार्थ्यांना तात्काळ कृषी अवजारे वाटप करण्याच्या अनुषंगाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१५-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग सेसच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील शेतकऱ्यांना अनुदानावर कृषी अवजारे दिली जातात.

(२) (३) व (४) हे खरे नाही.

सन २०२२-२३ मध्ये लाभार्थ्यांना कृषी अवजारे वाटप करण्याच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग कार्यालयाने दिनांक २६.१२.२०२२ अन्वये प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तारकर्ली समुद्र किनारी पर्यटकांच्या सुरक्षितेसाठी उपाययोजना करण्याबाबत

**(२३) ५३७८८ (२१-०१-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या माहे सप्टेंबर, २००६ मध्ये वा त्या दरम्यान काढलेल्या शासन निर्णयानुसार पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी राज्यातील समुद्र किनाऱ्यांवर जीवरक्षक व इतर सुरक्षात्मक उपाययोजना मंजूर करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटकांची मोठी पसंती असलेल्या तारकर्ली समुद्र किनारी पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी उक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने कोणत्याच उपायोजना करण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पर्यटकांच्या सुरक्षात्मक उपाययोजना तातडीने उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२८-०६-२०२३) :** (१) होय.
(२) प्रादेशिक पर्यटन विकास योजनांतर्गत सन २०१७-१८ मध्ये सिंधुदुर्ग समुद्र किनारी सुरक्षा उपाय योजनांतर्गत जेट स्कीज, रेस्क्यू ट्यूब्स, रेस्क्यू बोर्ड, रंगीत झेंडे, सर्च लाईट्स, फ़्लड लाईट्स इ. वस्तू करिता रू. ८०.०० लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच, निर्मल सागर तट अभियान अंतर्गत समुद्र किनारी इशारा देणारे लोखंडी बोर्ड, सिमेंट बेंच उभारण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मे.प्रताप नाना महाले कांदा खरेदी विक्री केंद्र, मोराणे (ता.जि.धुळे) या उक्त नोंदणी परवानाधारक संस्थेकडून झालेल्या कामाची लेव्हीसह मजुरी वसुली करणेबाबत**

**(२४) ५३८०३ (१८-०१-२०२३). श्री.फारूक शाह (धुळे शहर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मे.प्रताप नाना महाले कांदा खरेदी विक्री केंद्र, मोराणे (ता.जि.धुळे) या ठिकाणी नोंदणीकृत परवाना धारक मापारी कामगारांकडून माहे फेब्रुवारी, २०२१ ते फेब्रुवारी, २०२२ काम करून घेणे आणि या कालावधीमध्ये उक्त ठिकाणी झालेल्या कामाची लेव्हीसह मनलमरी वसुली करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परवाना धारक नोंदणीकृत मापाडी कामगारांना काम देणे बाबत शासन निर्णय असताना आणि संचालक महाराष्ट्र राज्य पुणे यांनी मे प्रताप नाना महाले कांदा खरेदी विक्री केंद्र मु.पो. मोराणे (ता.जि.धुळे) या खाजगी संस्थेस परवानगी दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त नोंदणी परवानाधारक संस्थेकडून माहे फेब्रुवारी, २०२१ ते माहे फेब्रुवारी, २०२२ या कालावधीतील कामांची लेव्हीसह मजुरी ५६ लाख ६२ हजार १५० रुपये वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे (१५-०६-२०२३) :** (१) अध्यक्ष, मापाडी कामगार संघटना, धुळे यांचे दि.१९.०३.२०२१ रोजीचे निवेदन व चिटणीस, महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन, नाशिक यांचे दि.२८.०९.२०२२ रोजीचे निवेदन मंडळास प्राप्त झालेले असून सदर निवेदनाद्वारे दोन्ही संघटनांनी मंडळातील नोंदीत मापाडी कामगारांची माहे फेब्रुवारी, २०२१ ते फेब्रुवारी,२०२२ या कालावधीमधील मजुरी व लेव्हीची रक्कम वसूल करून मिळावी अशी मागणी मंडळाकडे केलेली आहे.
() मे.प्रताप नाना महाले खाजगी कृषी उत्पन्न बाजार समिती, मु. पो. मोराणे (ता.जि.धुळे) या खाजगी बाजार समितीस पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.०८.१०.२०२१ रोजी अनुज्ञप्ती परवाना क्र. (PML-७७/२०२१) दिलेला आहे.
(३) मे. प्रताप नाना महाले कांदा खरेदी विक्री केंद्र मु.पो. मोराणे (ता.जि.धुळे) या या खाजगी संस्थेस बाजार समिती येथे कामकाजासाठी माथाडी मंडळाने दि.२४.०५.२०१२ रोजी टोळी क्र.१,२७,३४ व ५५ मधील माथाडी कामगारांना नियुक्ती /सुपूर्द करण्यात आलेले होते. तथापि, सदर नियुक्त केलेल्या माथाडी कामगारांना कामावर हजर करून घेण्यात आले नाही. याबाबत कामगार संघटनांनी मंडळांकडे मागणी केलेली असून याविषयी झालेल्या सुनावण्यांदरम्यान वसूल करावयाच्या रकमेबाबत सबळ/भक्कम पुरावे संघटनेने सादर केलेले नाहीत. त्यामुळे वसुलीबाबत प्रमाणपत्र जिल्हाधिकारी,धुळे यांचेकडे अद्यापपर्यंत सादर करणे शक्य झालेले नाही.

मे. प्रताप नाना महाले खाजगी कृषी उत्पन्न बाजार समिती, मु.पो. मोराणे या आस्थापनेस क्षेत्रीय माथाडी निरीक्षक यांनी दि.२०.०४.२०२१ रोजी भेट देऊन निरीक्षण शेरे पारित केले आहेत. त्रुटींची पूर्तता न केल्याने संबंधित आस्थापना,व्यापारी यांचे विरूध्द मा. कामगार न्यायालय, धुळे येथे खटले दाखल केलेले असून सद्यस्थितीत ते न्यायप्रविष्ठ आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## 'एमपीएच' वेतनवाढ घोटाळ्याच्या रक्कमेची वसुली करुन गुन्हे नोंदविण्याबाबत

**(२५) ५३९४५ (२०-०१-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात कार्यरत असलेल्या २७ अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे अतिरिक्त शिक्षण घेतल्याचे नोंदणी प्रमाणपत्र नसतांनाही त्यांना तीन व सहा आगाऊ वेतनवाढी देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वैद्यकीय क्षेत्रात किमान तीन वर्षाचा अभ्यासक्रम (डीएनबी, फेलोशिप, एमडी, एमएस, डीएम) पदव्यत्तर पदवी मानली जाते तर तीन वर्षांपेक्षा कमी व दोन वर्षांच्या अभ्यासक्रमाला पदविका संबोधले जाते. दरम्यान, केरळमधील श्री. चित्रा तिरुनल इस्टिट्यूट फॉर मेडिकल सायन्सेस ॲण्ड टेक्नॉलॉजी त्रिवेंद्रममार्फत देखील एमपीएच हा दोन वर्षाचा अभ्यासक्रम शिकविला जातो. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने या संस्थेच्या एमपीएच अभ्यासक्रमाला पदविका ग्राह्य धरावी, असे स्पष्ट नमूद केलेले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास असे असतांना नियमबाह्यरित्या तीन ऐवजी सहा आगाऊ वेतनवाढीचा लाभ दिला गेला असून तसेच सीपीएस संस्थांमधून डीपीएच पदविका मिळविणाऱ्यांवरही जिल्हापरिषदेने वेतनवाढी दिल्याचे निदर्शनस आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बीड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात एमएमसी (महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल) या संस्थांकडे वैद्यकीय शिक्षणातील पदवीची नोंद नसतांनाही वेतनवाढी दिल्याची चौकशी करुन गुन्हे नोंदवून, आगाऊ रक्कम वसुल करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री, अप्पर मुख्य सचिव, आरोग्य विभाग, मंत्रालय, तसेच विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना निवेदन देऊन मागणी केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१५-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) भारतीय आयर्विज्ञान परिषद संशोधन, अधिसूचना नवी दिल्ली दिनांक ८ डिसेंबर २०१० व श्री चित्रा तिरुनल आयुर्विज्ञान और प्रोद्योगिकी संस्थान अधिसूचना त्रिवेंद्रम दिनांक २० डिसेंबर २०११ अन्वये एमपीएच (MPH) ला पदवी संबोधण्यात आलेले आहे. तसेच भारतीय आयुर्विज्ञान परिषद, भारत सरकार यांनी पत्र दिनांक १०/०९/२०१३ अन्वये श्री चित्रा तिरुनल इन्स्टिट्यूट फॉर मेडिकल सायन्स अँड टेक्नॉलॉजी थिरुयाननथापुरम केरला या संस्थेस मान्यता देण्यात आलेली आहे.
(३) हे खरे नाही.

बीड जिल्हा परिषदे अंतर्गत एकूण २७ कार्यरत अधिकाऱ्यांपैकी १५ पदवीत्तर पदविका धारकास ३ अतिरिक्त वेतनवाढी व १२ पदव्युत्तर पदवी धारकास ६ अतिरिक्त वेतन वाढी मंजूर केलेल्या आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभाग शा. नि. दि.१४.१२.२०११ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी ( वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० + ग्रेड पे ५४०० /- ) या पदावर नियुक्त झाल्यानंतर

पदवीत्तर पदविका धारकास तीन अतिरिक्त वेतनवाढी व पदवीत्तर पदवी धारकास ६ अतिरिक्त वेतनवाढी अनुज्ञेय असतील.

त्यानुसार बीड जिल्हा परिषदेअंतर्गत कार्यरत २७ अधिका-यांपैकी २१ अधिका-यांना पदवीत्तर पदवीका धारकास ०३ व पदवीत्तर पदवी धारकास ०६ अतिरिक्त वेतनवाढी जिल्हा परिषदेने मंजूर केलेल्या आहेत.

(४) होय हे खरे आहे.

(५) पदव्यत्तर पदविका/पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण झाल्याच्या गुणपत्रिकान्वये सार्वजनिक आरोग्य विभाग शा. नि. दि.१४.१२.२०११ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या अतिरीक्त वेतनवाढ देण्यात आल्या असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्याचा प्रश्न उद्धवत नाही.

(६) विलंब झालेला नाही.

---

## सुकळी वीर (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथे बंदोबस्तावर कार्यरत असतांना मृत्यू झालेल्या होमगार्डच्या कुटुंबाला सानुग्रह अनुदान देण्याबाबत

**(२६) ५३९७३ (२४-०१-२०२३). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत सार्वजनिक निवडणुक सन २०२०-२१ च्या वेळी होमगार्ड सुमेद गोमाजी मोगले (बक्कल नं.२०४४) हे दिनांक १३/०१/२०२१ रोजी मौजे सुकळी वीर, (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथे बंदोबस्तावर कार्यरत असतांना त्यांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त होमगार्डच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी दिनांक २२/०३/२०२१ रोजी शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावास तात्काळ मंजूरी देऊन होमगार्डच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान देण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक ०९/११/२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने मृत्य पावलेल्या व्यक्तीच्या कुटूंबियांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

**श्री. गिरीश महाजन (१४-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) जिल्हाधिकारी हिंगोली यांचे मार्फत मयत श्री. सुमेद गोमाजी मोगले यांच्या पत्नी श्रीमती. वैशाली सुमेद मोगले यांना रु.१०,०००००/ (अक्षरी दहा लक्ष रुपये) सानुग्रह अनुदान म्हणून दिंनाक १३/१२/२०२२ रोजी धनादेशाव्दारे वितरीत करण्यात आले आहे.

---

## जिल्हा परिषद पुरुष व स्त्री आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या व सेवा प्रवेश नियमाबाबत.

**(२७) ५४१६६ (२१-०१-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद पुरुष व स्त्री आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या व सेवा प्रवेश नियमाबाबत महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटना यांनी शासनास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशिक्षण कालावधी, विकास श्रेणीमध्ये २५ टक्के वाटा, आरोग्य निरीक्षक पदाची वेतनश्रेणी त्रूटी दूर करणे, आरोग्य पर्यवेक्षकाची २२४ पदे कार्यान्वित करणे, तालुका स्तरावर आरोग्य पर्यवेक्षकाची ३ पदे प्रस्तावित करणे, व इतर मागण्या या निवेदनाद्वारे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने जिल्हा परिषद पुरुष व स्त्री आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या मान्य करण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१६-०६-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) सदर निवेदन तपासुन योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केज, (जि. बीड).येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) मधील रिक्त पदे भरण्याबाबत.**

**(२८) ५४१७३ (२१-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज (जि. बीड) येथे गरीब शेतकऱ्यांच्या मुलांना विनामूल्य कौशल्य विकासाचे शिक्षण मिळावे या उद्देशाने शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) साठी भव्य ईमारत झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी मंजूर १४ पदापैकी तब्बल ८ पदे रिक्त असून त्यात प्राचार्य ०१, शिल्प निदेशक ०४, कनिष्ठ लिपिक ०२, चतुर्थ श्रेणी कर्मचारी ०१, अशी रिक्त पदे आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने उक्त तालुका हा मागास तालुका आहे तसेच येथील ITI ला भव्य अशी ईमारत आहे त्यामुळे याभागातील होतकरू व गोरगरीब शेतकऱ्यांच्या मुलांना विनामूल्य कौशल्यविकासाचे शिक्षण मिळण्यासाठी सदर ठिकाणचे रिक्त पदे भरण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे कौशल्य विकास मंत्री यांच्याकडे दिनांक १९/०९/२०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आली आहे काय, चोकशीमध्ये काय आढळून आले, तद्नुषंगाने उक्त रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२०-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
तथापि, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, केज, जि. बीड या संस्थेतील रिक्त पदांपैकी शिल्प निदेशकाची ३ पदे तासिका तत्वावर व कनिष्ठ लिपिकाचे एक पद प्रतिनियुक्तीने भरण्यात आले आहे.
(३), (४) व (५) मा. विधानसभा सदस्य यांचे दि. १९/०९/२०२२ रोजीचे निवेदन प्राप्त झाले असून, या विषयाच्या अनुषंगाने व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील गट-अ व गट-ब संवर्गातील प्राचार्य संवर्गातील पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच गट-क संवर्गातील शिल्प निदेशकांची १४५७ पदे सरळसेवेने भरण्याकरिता संचालनालयामार्फत दि. १७/०८/२०२२ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून, पदभरतीची कार्यवाही सुरु आहे. तसेच संचालनालयातील गट-क संवर्गातील एकूण ७७२ पदे सरळसेवेने भरण्यासाठी संचालनालयामार्फत दि. १६/०२/२०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. संचालनालयातील लिपिक-टंकलेखकांची ३९३ पदांची जाहिरात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दि.२०/०१/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच चतुर्थश्रेणी कर्मचारी संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी शासनाच्या अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे मागणीपत्र सादर करण्यात येत आहे.

---

**बिलोली (जि.नादेड) येथील जिल्हा परिषद शाळेच्या स्टोर रूमला आग लागल्याबाबत**

**(२९) ५४५५७ (२१-०१-२०२३). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिलोली (जि.नादेड) येथील जिल्हा परिषद शाळेच्या स्टोर रूमला आग लागून रूम मधील सर्व साहित्य जळून खाक झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेत विजेचे कनेक्शन नसताना आग कशामुळे लागली अथवा भ्रष्टाचार लपविण्यासाठी स्टोर रूमला आग लावण्यात आली, याबाबत संबंधित शाळेचे सहशिक्षक व गावकऱ्यांनी शंका व्यक्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी काय आढळून आले, तद्नुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२१-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

गटशिक्षणाधिकारी यांच्या अहवालानुसार शाळेतील एका वर्गखोलीस अज्ञात व्यक्तीने आग लावल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) व (४) होय, चौकशी केली आहे. चौकशीमध्ये अज्ञात व्यक्तीने वर्गखोलीस आग लावल्याचे सकृत दर्शनी निदर्शनास आले असुन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

---

**रावेर तालुक्यातील ( जि. जळगांव ) ग्रामपंचायत स्तरावर १५ व्या वित्त आयोगाचा निधी खर्च झाला नसल्याबाबत**

**(३०) ५४५८३ (२१-०१-२०२३). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर तालुक्यातील ( जि. जळगांव ) ग्रामपंचायत स्तरावर १५ व्या वित्त आयोगाचा निधी खर्च झाला नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय,चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त निधी खर्च झाला नसल्याप्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१५-०६-२०२३) :** (१) अंशता खरे आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून ज्या ग्रामपंचायतीचे निधी खर्च प्रलंबित होते त्यांची तालुकास्तर व जिल्हास्तरावर बैठक घेण्यात येऊन त्यांना येणाऱ्या तांत्रीक अडचणी व इतर बाबींबाबत शंका निरसन करून त्यांना मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. सदयस्थितीमध्ये रावेर तालुक्यातील मौजे खिरोदा (प्र.रा) येथील खर्च हा तांत्रिक अडचणी मुळे प्रलंबित आहे. तसेच तालुक्यातील उर्वरीत सर्व ग्रामपंचायतचा खर्च करण्यात आलेला आहे. तसेच संपूर्ण खर्चाचे मार्च अखेर पर्यंत नियोजन करण्यात आलेले असुन १०० टक्के खर्च करणेची कार्यवाही पुर्ण करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर व उस्मानाबद जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मंजूर मुख्याध्यापक व उपशिक्षकांचीही पदे रिक्त असल्याबाबत

**(३१) ५४७११ (२१-०१-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर व उस्मानाबद जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मंजूर मुख्याध्यापकांच्या पदांपैकी अनेक पदे रिक्त असून उपशिक्षकांचीही अनेक पदे रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी शिक्षकांवर शिकवणुकीचा अतिरक्त ताण येवून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होत असल्याने सदरची रिक्त् पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२७-०६-२०२३) :** (१) जिल्हा परिषद उस्मानाबाद येथील मुख्याध्यापकांची जानेवारी २०२३ अखेर ४ पदे रिक्त आहेत. जिल्हा परिषद सोलापूर येथील मुख्याध्यापकांची मराठी माध्यमाचे ७७ पदे रिक्त आहेत. तसेच डिसेंबर २०२२ अखेर उपशिक्षकांची मराठी माध्यम ४६७, कन्नड माध्यम २५ व उर्दु माध्यम ५८ अशी एकून ५५० पदे रिक्त आहेत.

(२) शासनाच्या बदली वेळापत्रकानुसार सध्या प्राथमिक शिक्षक सवर्गाच्या जिल्हांतर्गत बदल्या ऑनलाईन पध्दतीने शासनांच्या TTMS (Teacher Transfer Manegement System) या बदली पोर्टलद्वारे प्रक्रिया चालू आहे. तसेच पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरती प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात अपारंपारिक उर्जेची बायोगॅस योजना दोन वर्षापासून बंद असल्याबाबत

**(३२) ५४७७८ (२७-०१-२०२३). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अपारंपारिक उर्जेची घोषणा, बायोगॅस योजना दोन वर्षापासून बंद असून केंद्र शासनाकडून अपारंपारिक उर्जेचा वापर करण्याच्या घोषणेसह केंद्र शासन व राज्य शासनाकडून बायोगॅस योजनेकरिता अनुदान देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाकडून अनुदान प्राप्त न झाल्याने राज्यातील बायोगॅस योजना मागील दोन वर्षापासून बंद असल्याचे निदर्शनास आले असून, या योजनेसाठीचा राज्य शासनाचा २० कोटीचा निधी व्यपगत झाल्याचे निर्देशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास अपांरपारिक उर्जेचा वापर वाढण्याकरिता केंद्र व शासनाकडून अनुदानामध्ये वाढ होऊन बंद झालेली योजना सुरु करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-०६-२०२३) :** (१) सदर योजना दोन वर्षापासून बंद आहे, हे खरे नाही. सदर योजना १००% केंद्र पुरस्कृत असून राज्यशासनाकडून अर्थसंकल्पात प्रतिबिंबीत तरतूदीमधून निधी वितरीत करण्यात येतो. सन २०२१-२२ या वर्षात केंद्र शासनाकडून निधी तसेच बायोगॅस सयंत्र उभारणीचे उद्दीष्ट देण्यात आलेले नव्हते. त्यामुळे या वर्षी अनुदान वितरीत करण्यात आले नाही. तसेच सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात केंद्र शासनाकडून ६००० बायोगॅस सयंत्र उभारणीचे उद्दीष्ट प्राप्त असून राज्यातील ३४ जिल्ह्यांत उद्दीष्ट कळविण्यात आले आहे. तथापि अद्यापपर्यंत केंद्र शासनाकडून अनुदान वितरीत केलेले नाही. केंद्र शासनाकडून या आर्थिक वर्षात अनुदान प्राप्त होताच निधी वितरीत करण्यात येईल.

(२) सदर योजना दोन वर्षापासून बंद आहे, हे खरे नाही. सदर योजना बंद झालेली नाही. आर्थिक वर्ष सन २०२१-२२ मध्ये केंद्र शासनाकडून उद्दीष्ट तसेच निधी प्राप्त न झाल्याने राज्यशासनाकडील प्रतिबिंबीत रु. १८ कोटी ३८ लक्ष इतकी तरतूद समर्पित करण्यात आली. सन २०२२-२३ मध्ये केंद्र शासनाकडून उद्दीष्ट प्राप्त झालेले असून राज्यशासनाने रु. १८ कोटी ३८ लक्ष इतकी प्रतिबिंबीत तरतूद अर्थसंकल्पीत केलेली आहे. केंद्र शासनाकडून अनुदान प्राप्त होताच निधी वितरीत करण्यात येईल.
(३) केंद्र शासनाकडील नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाचे दिनांक २ नोव्हेंबर, २०२२ च्या पत्रान्वये नवीन राष्ट्रीय बायोगॅस व खत व्यवस्थापन कार्यक्रम योजनेच्या अंमलबजावणीस दिनांक १ एप्रिल, २०२१ ते ३१ मार्च, २०२६ पर्यंत प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा परिषद जालना येथील अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आर्थिक भ्रष्टाचार केल्याबाबत**

**(३३) ५४८३५ (२१-०१-२०२३). श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषद जालना येथील अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी काम वाटप समितीच्या माध्यमातून आर्थिक भ्रष्टाचार केल्या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी या बाबतची तक्रार मा.ग्रामविकास मंत्री यांना दिनांक ०७/११/२०२२ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या उपकार /सेस फंडातून मोठया प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केल्याचे आढळून आल्याने तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना यांनी याबाबत सविस्तर चौकशी करून त्या बाबतचा अहवाल विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचेकडे दिला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्नुषगांने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०५-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.(२) व (३) हे खरे नाही.

तथापि जिल्हा परिषदेच्या उपकर/ सेस फंडातून मोठया प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,जालना यांनी दि.२४.३.२०२२ रोजी चौकशी समिती गठित केली होती. सदर चौकशी समितीच्या अहवालात स्पष्टता नसल्याने दि.२०.१२.२०२२ रोजी नव्याने चौकशी समिती गठीत केली. सदर चौकशी समितीने केलेल्या चौकशीत अर्थसंकल्पिय तरतूदीनुसार रु.११.२० लक्षचे नियोजन करणे आवश्यक असताना फक्त रु.८१८ लक्षचे नियोजन करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली असून जि.प. उपकर अंतर्गत कलम १०० चे नियोजन करताना प्रशासकीय अनियमितता झाल्याचे दिसून येत आहे. यामध्ये आर्थिक स्वरुपाची अनियमितता झालेली दिसून येत नाही. मात्र सन २०१९ - २०२० ते २०२०-२०२१ या वर्षातील अनेक कामाच्या निविदा प्रक्रिया, कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर) व सबंधित कामे चालू झालेली नाहीत. त्यामुळे खर्च कमी झालेला आहे या व अन्य बाबींसंदर्भात तत्कालीन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. जालना यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरातील ( ता.जि. सोलापूर ) जिल्हा परिषदेच्या शाळेचे मनपामध्ये हस्तांतरण करण्याबाबत**

**(३४) ५४९६८ (२१-०१-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील (ता.जि. सोलापूर) जिल्हा परिषदेच्या शाळेचे मनपामध्ये हस्तांतरण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरेआहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरहू जिल्हा परिषद शाळा केव्हापर्यंत मनपामध्ये हस्तांतरीत होणे अपेक्षित आहेत,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२१-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) जिल्हा परिषदेच्या शाळा, मालमत्तेच्या मुल्यांकनाची रक्कम आकारुन (मालमत्ता व शिक्षकांसह) महानगरपालिका /नगरपालिका यांना हस्तांतरित करण्याचे शासनाचे धोरण आहे. सदर शाळांची मुल्यांकनाची रक्कम तसेच शिक्षकांची सहमती प्राप्त झाल्यानंतर यासंदर्भातील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

---

**राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत असलेल्या कंत्राटी निदेशक कर्मचाऱ्यांना कायम सेवेत घेणेबाबत**

**(३५) ५४९८५ (२१-०१-२०२३). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत गेली १२ वर्षापासून अल्प मानधनावर कंत्राटी निदेशक कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घेण्याबाबत औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कौशल्य विकास व उद्योजगता मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास एकूण किती कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत व या कंत्राटी कर्मचार्यांना सेवेत सामाऊन घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (१२-०६-२०२३) :** (१) होय, याबाबत शासनास निवेदने प्राप्त झालेली आहेत.

(२) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये सद्यस्थितीत २९७ कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील कार्यरत कंत्राटी शिल्पनिदेशक यांच्या शासन सेवेत नियमित करणेबाबत मागणीच्या अनुषंगाने मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन योग्य तो निर्णय घेण्यात यावा, असा निर्णय दिनांक १६ मे, २०२३ च्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेला आहे. तसेच कंत्राटी निदेशकांच्या मानधनात रु. १५०००/- वरुन रु. २५०००/- वाढ करण्याबाबत निर्णय देखील घेण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**पाचोरा-भडगांव मतदार संघातील (ता.भडगांव, जि.जळगांव) क्रिडा संकुलास निधी मिळणेबाबत**

**(३६) ५५०८२ (२१-०१-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाचोरा-भडगांव मतदार संघातील (ता.भडगांव, जि.जळगांव) क्रिडा संकुलास निधी मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५.७.२०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लेखी निवेदनानुसार शासनाने निर्णय घेतला आहे काय, याबाबत उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय बनसोडे (२०-०६-२०२३) :** (१) होय,
(२) तालुका क्रीडा संकुल, पाचोरा व तालुका क्रीडा संकुल, भडगांव या दोन्ही संकुलांसाठी वाढीव निधी मर्यादेत प्रत्येकी रू. १६०.०० लक्ष इतका निधी शासन निर्णय, दिनांक १३.१२.२०२२, दिनांक ३१.०३.२०२३ व दिनांक १४.०६.२०२३ अन्वये वितरीत केलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रिध्दपूर ते जालनापूर (ता.चांदूरबाजार,जि.अमरावती) रस्त्याचे बांधकाम निकृष्ट झाल्याबाबत**

**(३७) ५५११७ (२६-१२-२०२२). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रिध्दपूर ते जालनापूर (ता.चांदूरबाजार,जि.अमरावती) रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने रस्त्याची दूरवस्था झाली असल्याचे दिनांक २४/८/२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्यासह अनेक रस्त्यांच्या बांधकामात भ्रष्टाचार झाल्याची नागरीकांनी तक्रार संबंधित यंत्रणेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर भ्रष्टाचाराची चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१५-०६-२०२३) :**(१) व (२) अंशत : खरे आहे.

सोनोरी जालनापूर ते रिध्दपुर हा रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र.१६ दर्जाचा असून त्याची लांबी ५.५० कि.मी. आहे. माहे जुलै ते ऑगस्ट मध्ये अतिवृष्टीमुळे सदर रस्त्यावर काही ठिकाणी खड्डे पडले असून त्याची दुरुस्ती करण्यात आली आहे. सदर रस्त्याच्या कामात भ्रष्टाचार झाल्याची तक्रार जिल्हा परिषदेस प्राप्त झाली नसून रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याची तक्रार प्राप्त झाली आहे. तसेच अन्य रस्त्यांच्या बांधकामात भ्रष्टाचार झाल्याची तक्रार प्राप्त नाही.
(३) सोनोरी जालनापूर ते रिध्दपुर या रस्त्यावर सा.क्र.०/०० ते ५/५०० मध्ये खडीकरणाच्या पॅचेस सह डांबरीकरणाचे काम मंजूर असून सदर काम प्रगतीत आहे. सदर रस्त्याचे काम निकृष्ट झाल्याबाबत जिल्हा परिषदेकडे तक्रार प्राप्त झाली आहे.

यानुषंगाने राज्य गुणवत्ता निरीक्षक यांनी सदर कामाची तपासणी केली असून करण्यात आलेल्या कामात किरकोळ त्रुट्या असल्याचे नमूद केले असून काम समाधानकारक असल्याचे अभिप्राय दिलेले आहेत. त्यानुसार राज्य गुणवत्ता निरीक्षक यांच्या अहवालातील नमूद तांत्रिक त्रुटींची पूर्तता जिल्हा परिषदेमार्फत संबंधित कंत्राटदाराकडून करुन घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हवेली (जि. पुणे) या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रलंबित इमारतीच्या बांधकामाबाबत**

**(३८) ५५२०३ (२१-०१-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (जि. पुणे) याऔद्योगिक प्रशिक्षण संस्थेस स्वत:ची इमारत नसल्याने सध्या पेरणे फाटा येथे भाडयाच्या इमारतीमध्ये काम सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक १५/०३/२०२२ रोजीच्या कार्यालयीन आदेशाने प्रस्तावित बांधकामावरील खर्च जिल्हा नियोजन समिती, पुणे करणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने सदर इमातीच्या बांधकामास निधी मिळून देण्याबाबत तसेच कामास प्रत्यक्षात केव्हापासून सुरुवात करण्यात येणार आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०१-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, सदर प्रकरणी संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या दिनांक १५/०३/२०२२ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये प्रस्तावित बांधकामावरील खर्च जिल्हा नियोजन समितीमार्फत करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, हवेली जि.पुणे या संस्थेच्या प्रशासकीय व कार्यशाळा इमारतीचे बांधकाम करणे या कामास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती पुणे यांचेकडे सादर केला असता, जिल्हा वार्षिक योजनेमधून औद्योगिक प्रशिक्षण संस्था, हवेली या संस्थेचे बांधकाम करण्यात आल्यास पुढील २ ते ३ वर्षे सदर योजनेतून इतर कोणत्याही संस्थेची कामे हाती घेणे शक्य होणार नाहीत.

सबब, या प्रस्तावासाठी शासनस्तरावरुन निधी उपलब्ध करुन घेणे योग्य राहील असे जिल्हा नियोजन समिती, पुणे यांनी कळविले असल्याने राज्यस्तरीय योजनेंतर्गत सदर संस्थेच्या प्रशासकीय व कार्यशाळा इमारतीचे बांधकाम करणे या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी शासनास प्रस्ताव प्राप्त झाला असून वित्त विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्था हवेली, जि.पुणे या संस्थेच्या प्रशासकीय व कार्यशाळा इमारतीच्या बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, पुणे यांचेकडून नवीन २०२२-२३ च्या दरसूचीनुसार सुधारित अंदाजपत्रक शासनास सादर करण्यात आले आहे. या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनस्तरावरुन पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**वाटोडा शुल्केश्वर- म्हैसपुर (ता.भातुकली, जि.अमरावती) रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत**

**(३९) ५५४२३ (१८-०१-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाटोडा शुल्केश्वर- म्हैसपुर वाटोडा शुल्केश्वर- म्हैसपुर (ता.भातुकली, जि.अमरावती) रस्त्यावर मोठे खड्डे पडल्यामुळे नियमित दुर्घटना घडत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाटोडा शुल्केश्वर- म्हैसपूर रस्त्याची दुरुस्त करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम, विभाग अमरावती यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने रस्त्याच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१५-०६-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

सदर रस्ता क्षतीग्रस्त झालेला आहे. मात्र, सदर रस्त्यावर दुर्घटना घडल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) हे खरे आहे.

(३) सदर रस्त्याच्या सा.क्र.१/०० ते १/८०० या लांबीची दुरुस्ती लेखाशिर्ष ३०५४-२०१६ मधून रु.२५ लक्षचे दुरुस्तीचे काम करण्यात आले आहे. तसेच सदर योजनेतून सा.क्र.१/८०० ते ३/०० या लांबीतील रु.२८ लक्षचे काम मंजूर असून सदर काम प्रगतीत आहे. उर्वरित लांबीच्या दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेमार्फत सन २०२३-२४ च्या प्रारुप आराखड्यामध्ये प्रस्तावित करण्यात आले असून सदर काम निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## एरंडोल ( जि. जळगांव) तालुक्यातील क्रिडा संकुल अनुदान मर्यादेत सुधारणा करण्याबाबत

**(४०) ५५४५४ (२१-०१-२०२३). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एरंडोल ( जि. जळगांव) तालुक्यातील क्रिडा संकुल अनुदान मर्यादेत सुधारणा करण्याबाबत निर्णय झाला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पारोळा तालुक्यात क्रिडा संकुलाची उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी यांच्याकडून वारंवार मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुदानामध्ये किती अनुदान मर्यादेत वाढ करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, या अनुदानामध्ये कोणकोणती कामे करण्यात येणार आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. संजय बनसोडे (२०-०६-२०२३) :**(१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, दिनांक २३.०३.२०२२ अन्वये विभागीय, जिल्हा व तालुका क्रीडा संकुलांच्या अनुदान मर्यादेमध्ये वाढ करण्यात आलेली आहे.

(२) होय.

(३) बांधकाम पूर्ण/अपूर्ण असलेल्या तालुका क्रीडा संकुलांसाठीची वाढीव अनुदान मर्यादा रु.३००.०० लक्ष इतकी आहे.

(४) वाढीव अनुज्ञेय अनुदानामधून तालुका क्रीडा संकुल, पारोळा मधील यापूर्वी केलेल्या कामांची दुरुस्ती व नुतनीकरण, तसेच, नव्याने राज्य क्रीडा विकास समितीने विहित केलेल्या टाईप प्लानअनुसार मान्यता दिलेल्या क्रीडा सुविधांची निर्मिती करण्यात येणार आहे.

---

## राज्यातील गेली ३५ वर्षापासून विना अनुदान तत्वावरील चालू असलेल्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थाना अनुदान देण्याबाबत

**(४१) ५५५३९ (२१-०१-२०२३). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)राज्यातील गेल्या ३५ वर्षापासून विना अनुदानातील तत्वावरील २००१ पूर्वीच्या खाजगी आय.टी.आय. अनुदानाबाबत महाराष्ट्र राज्य अशासकीय आय.टी.आय. प्राचार्य व कर्मचारी संघटना, नाशिक यांनी दिनांक २१.८.२०२२ रोजीच्या सुमारास मा. मुख्यमंत्री , उपमुख्यमंत्री व कौशल्य विकास मंत्री, यांना लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लेखी निवदेनामध्ये कोणती मागणी करण्यात आली आहे,

(३) असल्यास, उक्त मागणीसंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०९-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) राज्यातील गेली ३५ वर्षापासून विना अनुदान तत्वावर चालू असलेल्या खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अनुदान देण्याची मागणी करण्यात आलेली आहे.

(३) सदर मागणीच्या अनुषंगाने कौशल्य, विकास व उद्योजकता विभागाव्दारे दि. २९ मे, २०१९ च्या शासन निर्णयानुसार व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेस मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजनेव्दारे आर्थिक दुर्बल घटकातील अनुसूचित ,इमाव, विजाभज व विमाप्र विद्यार्थ्यांना प्रशिक्षण शुल्काची रक्कम त्यांच्या उत्पन्नाच्या मर्यादेत प्रशिक्षण शुल्काच्या ८० ते १०० टक्के रक्कम त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यात जमा करण्यात येते.

खाजगी संस्थेत प्रवेश घेण्यासाठी प्रशिक्षणार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात येवून खाजगी संस्थांना प्रशिक्षण शुल्काच्या माध्यमातून संस्थेचा खर्च भागविणे शक्य व्हावे असा योजेनचा उद्देश आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## शिल्प निदेशक श्री.किरण प्रकाश झरकर ( कोपा ) शासकीय प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थी यांचे प्रश्नावर उपाययोजना करण्याबाबत

**(४२) ५६४७१ (२१-०१-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिल्प निदेशक श्री.किरण प्रकाश झरकर ( कोपा ) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वाशी (जि.उस्मानाबाद) यांनी व्यवसाय प्रशिक्षण परियोजना २०१४ शोध प्रबंध शासनाकडे सादर करून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थी यांचे प्रश्नावर उपाययोजना करण्यासाठी पाठपुरावा केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, पुणे यांच्या अधिपत्याखालील संस्थांचा प्रादेशिकअहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे, काय,

(३) असल्यास, सदर अहवाल मा. संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई यांना प्राप्त झाला आहे काय, तसेच, त्यांनी त्यावर समितीत छाननी व शिफारसी करून शासनाकडे सादर केला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०९-०६-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) होय, सदर अहवाल संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांना प्राप्त झालेला आहे. त्याअनुषंगाने संचालनालय स्तरावर सदर अहवालाबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## कौशल्य विकास, उद्योजकता, रोजगार व नाविन्यता विभागा अंतर्गत येणाऱ्या खाजगी व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण योजनेबाबत

**(४३) ५६४७३ (२१-०१-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कौशल्य विकास, उद्योजकता, रोजगार व नाविन्यता विभागाअंतर्गत येणाऱ्या खाजगी व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प निदेशांकसाठी व प्रशिक्षणार्थी यांच्यासाठी संशोधन करणे किवा शोध प्रबंध लिहिण्यासाठी कोणत्या योजना करण्यात आल्या आहेत,

(२) असल्यास, उक्त योजनेस काही सवलती तसेच प्रोत्साहन देण्यात येणार आहेत काय,

(३) असल्यास, आयआयटी, आयआयएम अभियांत्रिकी, वैद्यकिय संस्थानमध्ये ज्याप्रमाणे संशोधन व पेटंट केले जातात त्याप्रमाणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत केले जातात काय,

(४) असल्यास, संशोधन व पेटंट करण्यासाठी शिल्प निदेशक, गट निदेशक, प्राचार्य यांना पगारवाढ तसेच इतर सुविधा देण्यात आल्या आहेत काय, तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प निदेशक, गट निदेशक, प्राचार्य यांचे संशोधनाचे पेटंट करण्यात आले काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०९-०६-२०२३) : (**१), (२), (३) व (४) कौशल्य विभागांतर्गत येणाऱ्या खाजगी व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प निदेशकांसाठी व प्रशिक्षणार्थी यांच्यासाठी संशोधन करणे किवा शोध प्रबंध लिहिण्यासाठी कोणत्याही योजना सद्यस्थितीत अस्तित्वात नाहीत.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्हयात पिंगुळी ग्रामपंचायतीमार्फत १४ वा वित्त आयोग योजनेअंतर्गत कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४४) ५६६६१ (२४-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्हयात पिंगुळी ग्रामपंचायतीमार्फत १४ वा वित्त आयोग योजनेअंतर्गत पिंगुळी टेंब धुरीनगर गॅस पंप ते गणेश शेटकर घरापर्यंत भिडाची पाईपलाईन टाकण्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून उक्त कामात गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामाची सखोल चौकशी करण्याबाबत पिंगुळीतील ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची दखल न घेतल्यास ग्रामस्थांनी दिनांक २६ जानेवारीला उपोषण करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदर निवेदनाच्या अनुषंगाने जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. गिरीश महाजन (१२-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे
(३). हे खरे आहे
(४) पिंगुळी टेंब धुरीनगर गॅस पंप ते गणेश शेटकर घरापर्यंत भिडाची पाईपलाईन टाकण्याचे कामाबाबत गट स्तरावरून चौकशी करण्यात आलेली आहे. सदर कामामध्ये आर्थिक अनियमितता केल्याचे आढळून आले असून संबंधित ग्रामविकास अधिकारी यांचेवर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही

---

## जळगांव जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात आलेल्या टंचाई आराखडा सर्वेक्षणाबाबत

**(४५) ५७२४६ (२४-०४-२०२३). : श्री.अनिल पाटील (जळगाव ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यात सन २०१९ ते २०२२ दरम्यान सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला असून उन्हाळयात ज्या गावांना भीषण पाणी टंचाईचा सामना करावा लागत होता त्या गावांच्या संख्येत घट होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडून टंचाई आराखड्याचे सर्वेक्षण करण्यात आले असता यावर्षी टंचाई आराखड्यात ४३२ गावे संभाव्य पाणी टंचाईग्रस्त म्हणून नोंदविण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पाणी टंचाईवर मात करण्यासाठी २ कोटी ३३ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोणकोणत्या गावांमध्ये ही रक्कम खर्च करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०१-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) जळगाव जिल्हयातील १५ तालुक्यांसाठी ४३२ गावांसाठी जिल्हा प्रशासनाकडून २ कोटी ४४ लाखांचा संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला असून त्यासंदर्भात क्षेत्रीय स्तरावर पाणी टंचाई उपाययोजना सुरु आहेत.
(४) जळगाव जिल्हयातील १५ तालुक्यांमधील ४३२ गावांवर सदर खर्च करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्यातील स्वच्छ भारत अभियानांतर्गत प्लास्टिक कचरा व्यवस्थापनासाठी संकलन आणि प्रकिया प्रकल्प उभारण्याबाबत

**(४६) ५७३७९ (२४-०४-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील स्वच्छ भारत अभियानांतर्गत प्लास्टिक कचरा व्यवस्थापनासाठी नऊ तालुक्यातील प्रत्येकी एका ग्रामपंचायतीत संकलन आणि प्रकिया प्रकल्प उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्पासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीस २५ लाखाप्रमाणे सव्वादोन कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तदअनुषंगाने उक्त निर्णयाच्या अंमलबजावणी बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (११-०७-२०२३) :** (१) होय.
(२) नाही.

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत तालुकास्तरीय प्लास्टिक कचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारण्यासाठी प्रत्येक तालुक्यासाठी रु.१६.०० लक्ष निधीची तरतुद करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्प उभारणीकरिता अंदाजपत्रकानुसार रु.२४,९५,९१७/- एवढ्या रकमेला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी शासनामार्फत रु.१६.०० लक्ष व रु.१६.०० लक्षावरील अतिरिक्त लागणारा निधी ज्या ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रामध्ये प्रकल्प उभारण्यात येणार आहे त्या ग्रामपंचायतींनी १५ वा वित्त आयोग, MREGS, ग्रामपंचायत स्वनिधी, इतर निधीच्या स्त्रोतामधून तरतुद करावयाची आहे.
(३) सद्यस्थितीला रत्नागिरी जिल्ह्यातील तालुकास्तरीय प्लास्टिक कचरा व्यवस्थापनासाठी ०९ तालुक्यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यात आले आहेत. त्यापैकी ०८ तालुक्यांच्या जागा अंतिम करुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आल्या आहेत व त्यांच्या निविदा प्रक्रिया पुर्ण करुन कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हापरिषद, पंचायत समित्यांना १५ व्या वित्त आयोगातून सन २०२२-२३ या वर्षाचा निधी मिळाला नसल्याबाबत

**(४७) ५७३९२ (२४-०४-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हापरिषद, पंचायत समित्यांना १५ व्या वित्त आयोगातून सन २०२२-२३ या वर्षाकरीता मिळाणारा २० कोटी रुपये निधी अद्यापही मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निधी न मिळाल्याने अनेक विकासकामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने १५ व्या वित्त आयोगाचा निधी जिल्हा परिषद, पंचायत समित्यांना वितरीत करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१२-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) १५ व्या वित्त आयोगाने सन २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीसाठी त्याच्या अंतिम अहवालाच्या प्रकरण-७ च्या परिच्छेद ७.६२ द्वारे २०२१-२२ ते २०२५ - २६ या कालावधीसाठी रीतसर गठित ग्रामीण स्थानिक संस्था (RI.Bs) साठी अनुदानाची शिफारस केली आहे. खर्च विभागाकडून जारी करण्यात आलेल्या परिचालन मार्गदर्शक तत्त्वांमध्ये असे नमूद केले आहे की, जर ग्रामीण संस्थांची रीतसर स्थापना केली असेल तर RLBS अनुदान देण्यास पात्र असल्याचे मानले जाईल. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांची रीतसर | स्थापना झाली नसेल तर, राज्याला अनुदान फक्त रीतसर स्थापन केलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी प्रो-रेटा आधारावर दिले जाईल असे कळविले आहे.

ज्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका झालेल्या नाहीत व प्रशासक कार्यरत आहेत अशा ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थां १५ व्या वित्त आयोगाच्या अनुदानास पंचायतराज मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शक तत्वांनुसार पात्र नाहीत.

ज्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका झालेल्या नाहीत व प्रशासक कार्यरत आहेत तरी सदर ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचे कामकाज हे अखंडपणे सुरूच आहे. निवडणूका झालेल्या नाहीत व प्रशासक कार्यरत आहेत म्हणून १५ व्या वित्त आयोगांतर्गत अनुदान रोखून धरणे योग्य होणार नाही याबाबत सचिव, वित्त मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांना अ.मु.स. (ग्रा.वि.व पं.रा.) यांच्या स्तरावर पत्र व्यवहार करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनासाठी रत्नागिरी जिल्ह्याचा सन २०२२-२३ चा आराखडा मंजूर करण्याबाबत

**(४८) ५७४५८ (२७-०४-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्याचा स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनासाठी सन २०२२-२३ चा ५६ कोटी ९९ लाख ३३ हजार रुपयांचा आराखडा मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामध्ये १३७२ गावांचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून १२४४ आराखडयांना प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तदनुसार अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. गुलाबराव पाटील (२०-०६-२०२३) :** (१) होय.
(२) नाही.

सद्यस्थितीला १५०६ गावांचे आराखडे तयार करण्यात आले आहेत, त्यापैकी १४४१ गावांच्या आराखडयांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(३) रत्नागिरी जिल्ह्यातील १५०६ गावांचे आराखडे तयार करण्यात आले आहेत, त्यापैकी १४४१ गावांच्या आराखडयांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, त्यापैकी १३९६ गावांची निविदा प्रक्रिया पुर्ण करुन कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. तरी सद्यस्थितीला १३७८ गावांमध्ये कामे प्रगतिपथावर आहेत.

---

**राज्यातील जिल्हा परिषदेमधील भरती मागील साडेतीन वर्षाहून अधिक काळ प्रलंबित असल्याबाबत**

**(४९) ५७७९६ (२४-०४-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदेमधील भरती मागील साडेतीन वर्षाहून अधिक काळ प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील तीन सरकारच्या काळात विविध कारणास्तव उक्त भरती प्रलंबित आहे तसेच तीन वेळा ही भरती पुढे ढकलल्यानंतर रद्द करण्यात आल्याने भरती इच्छुक तरुण, तरुणींमध्ये प्रचंड असंतोष आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले आहे तद्अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१९-०६-२०२३) :** (१) होय.

(२) व (३) होय. जिल्हा परिषदांकडील गट-क मधील १८ संवर्गातील रिक्त पदे ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी जिल्हा परिषदांमार्फत माहे मार्च, २०१९ मध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. ही पदे शासनाच्या महाआयटी मार्फत परीक्षा घेऊन भरण्यात येणार होती. दरम्यान लोकसभा व विधानसभा निवडणूक आचारसंहिता तसेच, त्यानंतर महापोर्टल रद्द झाल्याने सदरची परिक्षा होऊ शकली नाही. कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभुमीवर वित्त विभाग शासन निर्णय दि.४.५.२०२० अन्वये सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग वगळता अन्य विभागातील पदभरतीवर निर्बंध घालण्यात आले होते.

तदनंतर या विभागाच्या अखत्यारितील जिल्हा परिषदेंतर्गत गट-क मधील आरोग्य व इतर संवर्गाच्या पदभरतीचा कालबध्द कार्यक्रम विभागाच्या दि.२१.१०.२०२२ व दि.१५.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये जाहिर करण्यात आला होता. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२१.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार परिक्षा टि.सी.एस./ आय.बी.पी.एस. या कंपन्याद्वारे ऑनलाईन पध्दतीने घ्यावयाच्या आहेत. त्यानुसार आय.बी.पी.एस. या कंपनीसोबत सामंजस्य करार (MOU) अंतिम करण्यात आला असून त्यानुषंगाने Application Portal विकसित करुन लवकरच जिल्हा परिषद स्तरावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येणार आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील तिवसा, मोर्शी, अमरावती व भातकुली तालुक्यातील "क " वर्ग तिर्थक्षेत्राच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(५०) ५७८६५ (२४-०४-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील तिवसा, मोर्शी, अमरावती व भातकुली तालुक्यातील :"क " वर्ग तिर्थक्षेत्राच्या विकासासाठी निधी अपूर्ण असल्याने या तिर्थक्षेत्रांचा विकास प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त तालुक्यातील " क " वर्ग तिर्थक्षेत्राच्या विकासास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१३-०६-२०२३) :** (१) व (२) अंशत: खरे आहे. ग्रामविकास विभागाच्या दिनांक १६ नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये क-वर्ग तीर्थक्षेत्रांना जिल्हा नियोजन समितीव्दारा निधी दिला जातो. जिल्ह्यांकडे उपलब्ध निधीच्या मर्यादेत, तीर्थक्षेत्रांना निधी उपलब्ध करून देण्यात येतो. जिल्हा परिषद, अमरावती यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार सन २०२१-२२ मध्ये तिवसा, मोर्शी, अमरावती व भातकुली तालुक्यातील "क"वर्ग दर्जा प्राप्त एकूण १६७ तीर्थक्षेत्रांच्या ८५ कामांना रु.२२१.०० लक्ष इतकी रक्कम मंजूर केली आहे. तसेच सन २०२२-२३ मध्ये या तीर्थक्षेत्रातील २४ कामांना प्रशासकीय मान्यता दिली असून अंदाजपत्रके व निविदेची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.